दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


### भारताला टेरिफ रिफंड?

**नवी दिल्ली:** अमेरिकेत सुरू असलेल्या व्यापार चर्चांदरम्यान भारतासाठी मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या काळात लादण्यात आलेल्या मनमानी टॅरिफबाबत अमेरिकन न्यायालयाने आक्षेप घेतल्यानंतर आता भारतीय वस्तूंवर आकारलेल्या शुल्काच्या परताव्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्या काळात भारतीय वस्तूंवर लावण्यात आलेल्या मोठ्या टॅरिफपैकी सुमारे १० ते १२ अब्ज डॉलर्स इतका भाग बेकायदेशीर ठरू शकतो.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 बुधवार, दि. २२ एप्रिल, २०२६ वर्ष - १ अंक - २०७ पाने - ४



## सारांश वृत्त

### महिला आरक्षणाचा ढाल म्हणून वापर

**पणजी :** गोव्यातील काँग्रेसने मंगळवारी मागणी केली की, मोदी सरकारने २०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करून विद्यमान ५४३ लोकसभा जागांवर ३३ टक्के आरक्षण लागू करावे. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (एआयसीसी) सचिव अंजली निंबाळकर यांनी असा आरोप केला आहे की, भाजप मतदारसंघ पुनर्रचनेचा आग्रह धरून २०२९ च्या निवडणुकांसाठी महिला आरक्षण कायद्याचा ढाल म्हणून वापर करण्याचा प्रयत्न करत आहे.

### इंधन आणि एलपीजीचा पुरेसा साठा

**कोहिमा :** तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसी) मंगळवारी सांगितले की, नागालँडमध्ये एलपीजी आणि पेट्रोलियम उत्पादनांचा पुरवठा पूर्णपणे सामान्य आणि नियंत्रणात असून, राज्यभरात पुरेसा साठा उपलब्ध आहे. तसेच, त्यांनी नागरिकांना घाबरून खरेदी न करण्याचे किंवा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. मजबूत पायाभूत सुविधा, सतत देखरेख आणि राज्य सरकारसोबतच्या घनिष्ठ समन्वयाच्या माध्यमातून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित केला जात आहे.

### जमीन विक्रेत्याची गोळ्या घालून हत्या

**रांची :** झारखंडच्या रांची जिल्ह्यात आर्थिक वादातून एका मध्यमवयीन जमीन व्यापाऱ्याची गोळ्या झाडून हत्या केल्याचा आरोप आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. आरोपीला अटक करण्यात आली आहे. तो मंदिरातून परत येत असताना, पांडर चौकी परिसरातील ओटीसी मैदानाजवळ सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

संसदीय अधिकारांवरून नवा वाद

# मोदीविरोधात हक्कभंगाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्याकडे हक्कभंगाची नोटीस दाखल केली आहे. राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात लोकसभेच्या सदस्यांवर आरोप केल्याने संसदीय विशेषाधिकारांचा भंग झाल्याचा आरोप या नोटीसमध्ये करण्यात आला आहे.

वेणुगोपाल यांनी अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, १८ एप्रिल २०२६ रोजी पंतप्रधानांनी दूरचित्रवाणीवरून राष्ट्राला संबोधित करताना लोकसभेतील विरोधी सदस्यांच्या मतदानाच्या पद्धतीवर थेट टीका केली. तसेच त्यांच्या हेतूंवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे कृत्य लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर गदा आणणारे असून संसदीय परंपरांना बाधक असल्याचा दावा त्यांनी केला आहे. ही घडामोड संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्यानंतरची आहे. महिला आरक्षणाची अंमलबजावणी आणि लोकसभेच्या जागांची संख्या वाढवण्याच्या उद्देशाने मांडण्यात आलेल्या या विधेयकाला आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत मिळू शकले नाही. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पंतप्रधानांनी राष्ट्राला उद्देशून सुमारे २९ मिनिटांचे भाषण केले होते. या भाषणात त्यांनी विधेयक रोखल्याबद्दल विरोधकांवर टीका केली होती.



वेणुगोपाल यांनी आपल्या नोटीसमध्ये लोकसभेच्या कार्यपद्धती व कामकाज नियमांतील नियम २२२ चा उल्लेख करत विशेषाधिकारभंगाचा प्रश्न उपस्थित केला आहे. "आपले कर्तव्य बजावत असलेल्या लोकप्रतिनिधींवर सार्वजनिकरित्या आरोप करणे हा केवळ वैयक्तिक हल्ला नसून संसद आणि लोकशाही व्यवस्थेवर आघात आहे," असे त्यांनी नमूद केले आहे. तसेच संसदेची पवित्रता आणि सदस्यांचे घटनात्मक संरक्षण अबाधित ठेवण्यासाठी अध्यक्षांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान, काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधानांच्या भाषणावर तीव्र टीका केली. राष्ट्राला उद्देशून केलेले संबोधन हे सामान्यतः राष्ट्रीय ऐक्य आणि विश्वास निर्माण करण्यासाठी असते; मात्र या भाषणात पंतप्रधानांनी काँग्रेसवर वारंवार टीका करत पक्षपाती भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला. "अशा प्रकारचे वक्तव्य पंतप्रधान पदाच्या मर्यादांना शोभणारे नाही," असेही त्यांनी म्हटले. या नोटीसेवर पुढील निर्णय घेण्याचा अधिकार लोकसभा अध्यक्षांकडे असून, ती ग्राह्य धरायची की फेटाळायची यावर पुढील प्रक्रिया अवलंबून राहणार आहे. नोटीस मान्य झाल्यास हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवले जाऊ शकते. या घडामोडीमुळे संसदीय परंपरा, कार्यकारी सत्तेची मर्यादा आणि लोकप्रतिनिधींचे अधिकार या मुद्द्यांवर पुन्हा एकदा राजकीय व घटनात्मक वादाला तोंड फुटले आहे.

## यंदाचा उन्हाळा अतितिव्र होण्याचा अंदाज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** यंदाचे वर्ष तापमानवाढीच्या दृष्टीने गंभीर ठरण्याची चिन्हे दिसत असून 'एल निनो'चा परिणाम प्रकर्षाने जाणवणार असल्याचा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला आहे. यामुळे यावर्षी पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता असून उन्हाळा अतितीव्र होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

तज्ज्ञांच्या मते, सध्या १८७७ नंतरच्या सर्वात शक्तिशाली 'मेगा एल निनो' प्रक्रियेची चिन्हे दिसत आहेत. १८७७ मधील एल निनोमुळे जगभर उष्णतेच्या लाटा, दुष्काळ आणि साथीचे रोग पसरले होते. त्या काळात पृथ्वीवरील सुमारे ४ टक्के लोकसंख्येचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. त्याच प्रकारची स्थिती २०२६-२७ दरम्यान निर्माण होऊ शकते, असा इशारा वैज्ञानिकांनी दिला आहे.

सध्या प्रशांत महासागरात सुमारे ८,०४६ किलोमीटर लांबीची उष्णतेची प्रचंड लाट पसरली आहे. मायक्रोनेशियापासून सुरू झालेली ही उष्णतेची लाट कॅलिफोर्नियापर्यंत पोहोचली असून, तेथील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान विक्रमी पातळीवर नोंदले जात आहे.

वैज्ञानिकांच्या मते, प्रशांत महासागराचे वाढते तापमान, सागरी उष्णतेच्या लाटा, तसेच दक्षिणेकडील उष्ण वाऱ्यांचा प्रभाव यामुळे 'सुपर' किंवा 'मेगा एल निनो'ची स्थिती निर्माण होत आहे. सामान्यतः एल निनो दर २ ते ७ वर्षांनी येतो; मात्र यावेळी त्याची तीव्रता अधिक आहे. या पार्श्वभूमीवर भारतासह जगभरात हवामानाचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. देशात उष्णतेच्या लाटा तीव्र होण्याचा अंदाज आहे.

## सुनेत्रा पवारांकडून शरद पवारांचा उल्लेख

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** गेल्या अनेक दिवसांपासून संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेणारी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी आज प्रचाराची सांगता सभा पार पडली. या ऐतिहासिक सभेत बोलताना सुनेत्रा पवार यांनी, "आदरणीय पवार साहेबांचे आशीर्वाद आमच्यासाठी अत्यंत मोलाचे आहेत," असे विधान केले. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चांना उधाण आले आहे.

अजितदादांच्या निधनानंतर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरातून सावरत सुनेत्रा पवार यांनी केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर राज्याची जबाबदारीही समर्थपणे पेलली आहे. त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पक्षाच्या अध्यक्षपदाची धुराही आपल्या खांद्यावर घेतली. आता स्वतः उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सुनेत्रा पवारांनी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शरद पवारांचा केलेला उल्लेख राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे."अजित दादांना सर्वप्रथम मनापासून वंदन करते. या निवडणुकीमध्ये सर्वच पक्षाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल सुरुवातीलाच मी सर्वांचेच मनापासून आभार मानते. आदरणीय पवार साहेब व सौ सुप्रियाताई यांचे मी विशेष आभार मानते, अशा शब्दांत त्यांनी शरद पवारांचे आभार मानले.

विरोधकांना धमकावण्याचा आरोप; केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर

# मल्लिकार्जुन खर्गे यांचा पंतप्रधानांवर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र टीका करत, विरोधकांना 'धमकावण्याचा' आणि केंद्रीय तपास यंत्रणांचा राजकीय हेतूंसाठी गैरवापर करण्याचा गंभीर आरोप केला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशातील राजकीय वातावरण तापले असताना खर्गे यांच्या या वक्तव्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची नवी फेरी सुरू झाली आहे.

खर्गे यांनी म्हटले की, सत्ताधारी पक्ष विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी केंद्रीय



संस्थांचा वापर करत असून, ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. विरोधी पक्षातील नेत्यांवर सातत्याने कारवाया केल्या जात असून, यामागे राजकीय सूडबुद्धी असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की, "विरोधकांना गप्प बसवण्यासाठी दबावाचे राजकारण केले जात आहे. चौकशा आणि कारवायांच्या माध्यमातून विरोधी आवाज दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर आघात करणारे आहे."

काँग्रेस अध्यक्षांनी असा दावा केला की, देशातील अनेक राज्यांमध्ये निवडणुकांच्या आधी विरोधी नेत्यांवर कारवाईची गती वाढते, तर सत्ताधारी पक्षाशी संबंधित प्रकरणांकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे केंद्रीय यंत्रणांच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. खर्गे यांनी निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबतही चिंता व्यक्त केली. लोकशाही व्यवस्थेत सर्व पक्षांना समान संधी मिळणे आवश्यक असून, सत्तेचा गैरवापर करून राजकीय फायद्यासाठी वातावरण निर्माण करणे अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सत्ताधारी भाजपकडून या आरोपांना फेटाळण्यात आले असून, केंद्रीय यंत्रणा स्वतंत्रपणे आणि कायद्याच्या चौकटीत काम करत असल्याचे सांगितले जात आहे. भ्रष्टाचाराविरोधातील कारवाई ही राजकीय नसून कायदेशीर प्रक्रिया असल्याचा दावा भाजपने केला आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय यंत्रणांच्या वापराबाबतचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पुढील काळात या मुद्द्यावर राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

गुजरात एटीएसची कारवाई


# दहशतवादी कट उधळला; दोघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** राष्ट्रविरोधी हल्ल्यांचा कट रचणे, ऑनलाइन कट्टरतावादी विचारसरणीचा प्रसार करणे आणि देशभरात 'गझवा-ए-हिंद'चे जाळे उभारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गुजरात एटीएसने दोन तरुणांना अटक करत संभाव्य दहशतवादी कट उधळल्याचा दावा केला आहे.

एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, सिद्धपूर येथून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. २२ वर्षीय इरफान पठाण





हा अतिरेकी विचारसरणीच्या प्रभावाखाली येऊन राष्ट्रविरोधी कारवायांचे नियोजन करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर विशेष पाळत पथक तयार करून इरफानला सिद्धपूर येथे अटक करण्यात आली.

चौकशीदरम्यान आणि मोबाईलच्या फॉरेन्सिक तपासणीत, आरोपी व्हॉट्सअॅप आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून आयएसआयएसशी संबंधित घटक तसेच कट्टर विचारसरणीच्या व्यक्तींच्या संपर्कात असल्याचे उघड झाले. विविध राज्यांतील तरुणांना जोडून भूमिगत नेटवर्क उभारण्याचा त्याचा प्रयत्न असल्याचेही तपासात समोर आले.

एटीएसच्या म्हणण्यानुसार, आरोपी राजकीय नेते आणि आरएसएसशी संबंधित व्यक्तींना लक्ष्य करण्याच्या योजना आखत होते. तसेच आरडीएक्ससह स्फोटके तयार करण्याचे प्रशिक्षण, अतिरेक्यांची भरती, परदेशी संघटनांशी संपर्क आणि पाकिस्तान-अफगाणिस्तानमार्गे शस्त्रपुरवठ्याची व्यवस्था याबाबतही चर्चा झाल्याचे चॅट्समधून स्पष्ट झाले आहे. तपासाचा विस्तार करत एटीएसने मुंबईतील २१ वर्षीय मुर्शीद शेख यालाही अटक केली. दोन्ही आरोपींकडून अतिरेकी साहित्य, चॅट्स आणि संशयास्पद माहिती जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात निधीपुरवठा, आंतरराज्यीय नेटवर्क आणि परदेशी दुवे शोधण्यावर तपास केंद्रित असून, आणखी काही संशयितांचा शोध सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### खा. सुप्रिया सुळे थेट व्यासपीठावर

**बारामती :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेच्या निमित्ताने आज बारामतीमधील शारदा प्रांगणात शरद पवार गटाच्या कार्यकारी अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळेंची उपस्थिती लक्षवेधी ठरली. आ. रोहित पवार यांनी प्रचार केला. मात्र महायुतीच्या व्यासपीठावर जाणार नाही, अशी भूमिका घेत सांगता सभेला सांगता सभा टाळली. सुप्रिया सुळे यांना सुनेत्रा पवार यांनी फोन केला आणि सुळे या व्यासपीठावरच आल्या. खा. सुळे आपल्याला निमंत्रण नसल्याचे सांगत होत्या. मात्र सुप्रिया सुळे यांना सुनेत्रा पवार यांनी फोन केला आणि सुळे या थेट उपस्थित राहिल्या.

## विधानपरिषदेत काँग्रेसचा उमेदवार?

उद्धव ठाकरे उत्सुक नसल्याने मविआत चढाओढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानसभा पोटनिवडणुकीनंतर राज्यातील राजकारण आता विधानपरिषद निवडणुकीभोवती केंद्रीत झाले आहे. नऊ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचे पारडे जड मानले जात असून बहुतेक जागांवर त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

पक्षीय गणितानुसार महायुतीला आठ जागा सहज मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामध्ये भाजप पाच, शिवसेना दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस एक जागा जिंकू शकते, असा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तवला जात आहे. संख्याबळाच्या आधारावर महायुतीची स्थिती मजबूत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. आघाडीकडे सुमारे ४६ आमदारांचे संख्याबळ असल्याने त्यांचा एक उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. या एकमेव जागेसाठी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने दावा केला आहे. मात्र, ठाकरे यांनी स्वतः निवडणूक लढवण्यास नकार दिल्याची माहिती समोर येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटाकडून अंबादास दानवे यांच्या नावासाठी जोरदार पाठपुरावा सुरू आहे. मात्र, या नावाला काँग्रेसकडून विरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून उमेदवार पुढे करण्याची हालचाल सुरू झाली आहे. बाळासाहेब थोरात हे विधानपरिषद निवडणूक लढवू शकतात, अशी चर्चा आहे. ठाकरे निवडणूक लढवण्यास इच्छुक नसल्यास ही जागा काँग्रेसने मिळावी, अशी भूमिका काँग्रेसकडून घेतली जात आहे.


निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे आणि अमोल मिटकरी यांचा समावेश आहे. शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या दोन जागांसाठी पक्षात अंतर्गत रस्सीखेच सुरू असल्याचेही दिसून येत आहे.

खासगी वाहनांचा विळखा; सार्वजनिक वाहतुकीची 'जैसे थे' स्थिती

# वाढत्या वाहनांमुळे पुण्याची वाहतूक कोंडी कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहर हे केवळ शिक्षणाचे माहेरघर न राहता आता 'वाहनांचे शहर' बनले आहे की काय, असा प्रश्न पडू लागला आहे. शहरातील वाहतूक कोंडीचे मुख्य कारण रस्त्यांची कमतरता नसून, पुणेकरांचे खासगी वाहनांवरील अति-अवलंबित्व हेच असल्याचे पुणे पूर्व विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी स्पष्टपणे मांडले आहे. एका विशेष कार्यक्रमात बोलताना त्यांनी पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.
वाहतूक तज्ज्ञांच्या मते, कोणत्याही विकसित शहरात



किमान ५० ते ६० टक्के लोक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे अपेक्षित असते. मात्र, पुण्यात हे प्रमाण केवळ ११ टक्के इतकेच आहे. याचा अर्थ शहरातील तब्बल ८९ टक्के लोक प्रवासासाठी स्वतःच्या दुचाकी किंवा चारचाकी गाड्यांचा वापर करतात. यामुळेच रस्ते कितीही रुंद केले तरी ते वाहनांच्या संख्येपुढे अपुरे पडत आहेत.
मनोज पाटील यांनी सादर केलेली आकडेवारी थक्क करणारी आहे: २०१२ ची स्थिती: पीएमपीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या दररोज १२ लाख होती. २०२५ ची स्थिती: तब्बल १३ वर्षांनंतरही हा आकडा १२ लाखांवरच स्थिर आहे. शहराची लोकसंख्या आणि विस्तार दुपटीने वाढूनही सार्वजनिक बस सेवेचा वापर वाढण्याऐवजी तो जागेवरच अडकून पडला आहे, ही बाब शहराच्या नियोजनातील त्रुटी अधोरेखित करते. पुण्यात मेट्रो सेवा सुरू झाल्याने वाहतूक कोंडी कमी होईल अशी अपेक्षा होती. सध्या मेट्रोचा वापर करणाऱ्या प्रवाशांची संख्या ३ लाखांपर्यंत पोहोचली आहे. मेट्रोची व्याप्ती वाढत असली तरी, शहरात खासगी वाहनांची संख्या ७८ लाखांच्या पुढे गेली आहे. खासगी वाहनांच्या या अवाढव्य संख्येपुढे मेट्रो आणि बसची सध्याची क्षमता तोकडी पडत असल्याचे चित्र आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त पाटील यांनी यावर विशेष भर दिला की, जोपर्यंत पुणेकर आपली खासगी वाहने सोडून सार्वजनिक वाहतुकीकडे वळत नाहीत, तोपर्यंत वाहतूक कोंडीची समस्या पूर्णपणे सुटणे कठीण आहे. "सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नसणे किंवा तिचा वापर न करण्याची प्रवृत्ती, यामुळेच आज पुणे जगातील ५ व्या क्रमांकाचे धिम्या गतीचे शहर ठरत आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले.
आयटीएमएस सारख्या अत्याधुनिक यंत्रणा राबवून पोलीस वाहतुकीचे नियमन करतील आणि नियम मोडणाऱ्यांवर कारवाईही करतील. मात्र, वाहतूक कोंडीतून कायमस्वरूपी सुटका हवी असेल, तर सार्वजनिक वाहतुकीचा टक्का ११ टक्क्यांवरून किमान ४० ते ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे मोठे आव्हान पुणेकरांसमोर आणि प्रशासनासमोर आहे.

## दिल्लीत भाऊ-भाऊ म्हणतात आणि पाय खेचतात : गडकरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराणचे माजी प्रमुख अय्यातुल्ला खामेनी यांचं मूळ लखनऊ जवळचे आहे, याची माहिती त्यांनी आपल्याला दिली होती अशी आठवण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितली. मराठी माणसाचा साधेपणा आणि स्पष्टपणा दिल्लीत नाही, इकडे भाऊ-भाऊ म्हणतात आणि पाय खेचतात असंही गडकरी म्हणाले.

देशाच्या सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी यांच्या 'दिल्ली डायरी' या पुस्तकाचं नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. यावेळी नितीन गडकरी यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. दिल्लीत कशाचेही डुप्लिकेट असू शकते, नितीन गडकरींचेही ते डुप्लिकेट बनवू शकतात अशी मिश्कील टिप्पणी गडकरींनी यावेळी केली. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांनी हसून दाद दिली. नितीन गडकरी म्हणाले की, "भारत विकसित करत असलेल्या छाबाहार बंदराच्या कामासाठी इराणला जायचो त्यावेळी अय्यातुल्ला खामेनी यांची भेट व्हायची. एका भेटीवेळी खामेनी यांनी सांगितलं की, त्यांची पर्शियन भाषा ही संस्कृतमधून आली आहे. तसेच त्यांचे मूळ हे लखनऊ जवळ असल्याचंही खामेनी म्हणाले होते. गडकरी म्हणाले की, मराठी माणसाची विशेषता आणि मानसिकता मर्यादीत आहे. दिल्ली आणि मुंबईतील भौगोलिक अंतर किती आहे त्यापेक्षा मानसिकता महत्त्वाची आहे. मराठी माणूस दिल्लीत येत नाही, मुंबईत येण्याचा रस्ता आहे, पण परत जाण्याचा नाही, असेही ते म्हणाले.

## संपादकीय

# कयामतचा ट्रम्पेट!



**जागतिक राजकारणाच्या पटावर डोनाल्ड ट्रम्प यांचे पुनरागमन म्हणजे केवळ एका सत्ताधीशाची वापसी नव्हे, तर ती एका अनाकलनीय 'प्रलयंकारी' युगाची नांदी ठरण्याची चिन्हे आहेत. लोकशाही मूल्यांपेक्षा व्यक्तिकेंद्री आक्रमकता आणि विनाशाच्या भाकितांवर आधारलेले त्यांचे राजकारण जगाला कोणत्या संकटाच्या खाईत लोटणार, याचा हा वस्तुनिष्ठ अन्वयार्थ.**

वॉशिंग्टनच्या सत्तेच्या सोपानावर डोनाल्ड ट्रम्प यांची दुसऱ्यांदा झालेली प्रस्थापना ही केवळ रिपब्लिकन पक्षाचा विजय नाही, तर ती जागतिक व्यवस्थेसाठी एका 'अनप्रेडिक्टेबल' वादळाची पूर्वसूचना आहे. ट्रम्प यांना 'विनाशाचा प्रेषित' असे म्हटले जात आहे, त्याकडे पाहिल्यास लक्षात येते की, ट्रम्प यांचे राजकारण हे केवळ धोरणांवर नाही, तर भीती आणि भविष्यातील कयामतच्या चित्रावर आधारलेले आहे. ट्रम्प हे असे 'राजकीय किमयागार' आहेत ज्यांनी अमेरिकन जनतेला हे पटवून दिले की, जग विनाशाच्या उंबरठ्यावर आहे आणि तो विनाश रोखू शकणारा 'तारणहार' केवळ तोच एक आहे. ट्रम्प यांच्या या शैलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची 'अपोकॅलिप्टिक' (प्रलयंकारी) भाषा. त्यांच्या भाषणात वारंवार येणारे 'तिसरे महायुद्ध', 'अर्थव्यवस्थेचा पूर्ण ऱ्हास' किंवा 'बाहेरून होणारे आक्रमण' हे शब्द निव्वळ शब्द नसून, ते एका विशिष्ट मानसिकतेची निर्मिती करणारे अस्त्र आहेत. जेव्हा एखादा नेता सातत्याने विनाशाची भीती घालतो, तेव्हा सामान्य जनता तर्कसंगत विचार करण्याऐवजी भावनेच्या आहारी जाऊन 'संरक्षणा'चा मार्ग शोधते. ट्रम्प यांनी नेमकी हीच नस ओळखली आहे. त्यांनी अमेरिकन 'अहं'ला जागृत करताना जगाला एका अशा शत्रूच्या रूपात उभे केले आहे, ज्यापासून केवळ 'ट्रम्पिझम'च वाचवू शकतो. या राजकारणाचा सर्वात मोठा फटका बसणार आहे तो म्हणजे प्रस्थापित जागतिक संस्थांना. मग ते 'नाटो' असो, संयुक्त राष्ट्रे असोत वा जागतिक व्यापार संघटना. ट्रम्प यांच्या दृष्टीने या सर्व संस्था म्हणजे अमेरिकेची लूट करणारी यंत्रणा आहे. 'अमेरिका फर्स्ट' या गोंडस नावाखाली त्यांनी 'अमेरिका ओन्ली' (केवळ अमेरिका) हे जे धोरण राबवायला सुरुवात केली आहे, त्यामुळे जागतिक सुरक्षेची समीकरणे पार कोलमडून पडतील, अशी भीती आहे. युक्रेन-रशिया युद्धापासून ते पश्चिम आशियातील संघर्षापर्यंत, ट्रम्प यांची भूमिका ही 'न्याया'पेक्षा 'व्यवहारा'वर आधारित असेल. आणि जेव्हा महासत्ता केवळ व्यवहाराचा विचार करते, तेव्हा लहान राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा बळी दिला जाणे अपरिहार्य ठरते. ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांनी जागतिक बाजारात आधीच अस्वस्थता निर्माण केली आहे. आयात शुल्काचा बडगा उगारून जागतिक व्यापाराला वेठीस धरणे आणि हवामान बदलाच्या करारांना केराची टोपली दाखवणे, हे त्यांच्या 'विनाशकारी' दृष्टिकोनाचाच भाग आहे. हवामान बदल हे त्यांच्यासाठी 'खूळ' आहे आणि खनिज तेलाचा जास्तीत जास्त उपसा करणे हाच त्यांच्या मते प्रगतीचा मार्ग आहे. पृथ्वीच्या पर्यावरणाचा जो विनाश या धोरणामुळे होईल, त्याचे भाकित करणे आज कठीण नाही. ट्रम्प हे भविष्यातील पिढ्यांचे प्रश्न आजच्या नफ्यासाठी गहाण ठेवणारे नेते म्हणून इतिहासात नोंदवले जाण्याची दाट शक्यता आहे. ट्रम्प यांच्या राजकारणाचे दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे 'संस्थात्मक ऱ्हास'. न्यायव्यवस्था असो वा माध्यम संस्था, ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात ज्या प्रकारे या संस्थांना आव्हान दिले, ते पाहता यावेळेस ते अधिक आक्रमक असतील यात शंका नाही. 'फेक न्यूज'च्या नावाखाली सत्याचा गळा घोटणे आणि स्वतःला कायद्याच्या वर समजणे, ही वृत्ती लोकशाहीसाठी 'विनाशकारी' आहे. जेव्हा एखादा नेता स्वतःला 'प्रेषित' समजू लागतो, तेव्हा तो संविधानापेक्षा स्वतःच्या 'इंट्युशन'ला (अंतर्प्रेरणेला) जास्त महत्त्व देतो. आणि इतिहासाने हे वारंवार सिद्ध केले आहे की, अशा नेत्यांचे अंत हे अराजकाकडेच नेणारे असतात. भारतासारख्या देशासाठी ट्रम्प यांचे पुनरागमन हे 'दुधारी तलवार' आहे. एका बाजूला चीनला रोखण्यासाठी ट्रम्प भारताचा वापर करू शकतात, तर दुसऱ्या बाजूला व्यापार आणि व्हिसाच्या मुद्द्यावर ते भारताची नाकेबंदी करण्यासही मागे-पुढे पाहणार नाहीत. ट्रम्प यांच्याशी मैत्री करणे म्हणजे एखाद्या फिरत्या मगरीच्या पाठीवर बसण्यासारखे आहे—ती कधी आणि कोणत्या दिशेला वळण घेईल, याचा भरवसा कोणालाच देता येत नाही.'विनाशाचा प्रेषित' हे बिरुद ट्रम्प यांना उगाच लावलेले नाही. त्यांचे राजकारण हे द्वेषावर, भीतीवर आणि विनाशाच्या सावलीवर उभे आहे. त्यांनी जगाला एका अशा वळणावर आणून ठेवले आहे, जिथे शांतता ही केवळ युद्धाच्या दोन टप्प्यांमधील विश्रांती वाटते. ट्रम्प यांचा हा दुसरा कार्यकाळ हा जगासाठी 'अग्निपरीक्षा' असेल. जर जागतिक समुदायाने ट्रम्प यांच्या या 'प्रलयंकारी' लाटेला वेळीच थोपवले नाही, तर कयामतचा ट्रम्पेट वाजल्याशिवाय राहणार नाही.

# 'पर्शियन' अडेखोरपणाचा सांस्कृतिक अन्वयार्थ



**» अमेरिकेचे निर्बंध आणि इस्रायलशी असलेल्या संघर्षाच्या आगीत होरपळूनही इराण का कोसळत नाही, याचे उत्तर हजारो वर्षांच्या 'पर्शियन' अस्मितेत आणि सांस्कृतिक अडेखोरपणात दडलेले आहे.**

पश्चिम आशियातील भू-राजकीय सारीपाटावर इराण हा असा एक खेळाडू आहे, ज्याला बाद करण्याचे प्रयत्न गेल्या चार दशकांपासून सातत्याने सुरू आहेत. मग ते अमेरिकेचे आर्थिक निर्बंध असोत, इस्रायलसोबतचा 'सावली'तला संघर्ष असो वा अंतर्गत बंडाळीचे उमाळे असोत; इराण प्रत्येक वेळी कोसळता कोसळता पुन्हा उभा राहतो. हे का घडते? याचे उत्तर शोधताना आपल्याला केवळ तिथल्या अण्वस्त्रांचा किंवा लष्करी ताकदीचा विचार करून चालणार नाही, तर त्या देशाच्या सांस्कृतिक जडणघडणीचा आणि 'पर्शियन' मानसिकतेचा सखोल अभ्यास करावा लागेल. इराणच्या या न कोसळण्यामागे तिथली 'इस्लामी क्रांती' जेवढी जबाबदार आहे, त्याहून कितीतरी अधिक पटीने तिथली प्राचीन सांस्कृतिक मुळे कारणीभूत आहेत.

इराण हा अरबी देशांच्या गराड्यात असलेला एकमेव 'पर्शियन' देश आहे. ही सांस्कृतिक भिन्नता त्यांच्या अडेखोरपणाला खतपाणी घालते. कुबेरी भाषेत सांगायचे तर, इराणला आपल्या प्राचीन वारशाचा जो सार्थ अभिमान आहे, तोच त्यांच्यासाठी एक अभेद्य तटबंदी ठरला आहे. जग जेव्हा त्यांच्याकडे 'इस्लामी प्रजासत्ताक' म्हणून पाहते, तेव्हा ते स्वतःकडे 'पर्शियन साम्राज्याचे वारसदार' म्हणून पाहत असतात. हा फरक महत्त्वाचा आहे. कारण, धर्म हा माणसाला एकत्र आणू शकतो, पण संस्कृती त्याला 'लढण्याचे' बळ देते. इराणवर जेव्हा जेव्हा बाहेरून दबाव येतो, तेव्हा तिथला सामान्य नागरिक हा धर्मापेक्षा आपल्या सांस्कृतिक अस्मितेभोवती अधिक घट्टपणे गोळा होतो.

इराणच्या या टिकाऊपणाचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची 'प्रतिकाराची संस्कृती' . गेल्या ४५ वर्षांत इराणने निर्बंधांच्या सावलीत जगण्याचे एक वेगळे अर्थशास्त्र विकसित केले आहे. ज्याला आपण 'रेझिस्टन्स इकॉनॉमी' म्हणतो, ती केवळ आकड्यांची जुळवाजुळव नाही, तर ती एक मानसिक अवस्था आहे. पाश्चिमात्य जगाने इराणला एकाकी पाडण्याचा जेवढा प्रयत्न केला, तेवढाच इराणने 'स्वावलंबना'चा मार्ग चोखाळला. मग ते स्वदेशी बनावटीची ड्रोन विमाने असोत वा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे; इराणने हे सिद्ध केले आहे की, तांत्रिक प्रगतीसाठी नेहमीच 'सॉफ्टवेअर'ची गरज नसते, काही वेळा 'हार्ड' सांस्कृतिक इच्छाशक्तीही पुरेशी असते.

येथे एक कळीचा मुद्दा असा की, इराणमधील तरुण पिढी आणि तिथले धार्मिक नेतृत्व यांच्यात तीव्र मतभेद आहेत. 'हिजाब' विरोधी आंदोलने किंवा आर्थिक प्रश्नांवरून होणारी निदर्शने हे त्याचेच निदर्शक आहेत. मात्र, जेव्हा प्रश्न बाहेरच्या शत्रूशी दोन हात करण्याचा येतो, तेव्हा इराणचा अंतर्गत कलह बाजूला पडतो. याचे कारण असे की, तिथल्या नागरिकांना आपली 'संस्कृती' धोक्यात येईल याची अधिक भीती वाटते. इस्रायल किंवा अमेरिकेने जर लष्करी कारवाई केली, तर ती केवळ राजवटीवर नसून ती संपूर्ण पर्शियन संस्कृतीवर असेल, अशी धारणा तिथे जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आली आहे.

इराणने ज्या प्रकारे आपले 'प्रॉक्सी वॉर' नेटवर्क विणले आहे, त्याकडे पाहिल्यास त्यांच्या रणनीतीतील चातुर्य लक्षात येते. हिजबुल्ला, हमास आणि हूथी बंडखोरांच्या माध्यमातून इराणने आपली सुरक्षा सीमा आपल्या भौगोलिक सीमेच्या पलीकडे नेली आहे. हे केवळ लष्करी यश नाही, तर ते इराणच्या 'प्रभावाच्या राजकारणा'चा भाग आहे. पश्चिम आशियातील अरबी देशांना इराणची वाटणारी भीती ही त्यांच्या लष्करी सामर्थ्यापेक्षा त्यांच्या 'सांस्कृतिक आक्रमकता' आणि वैचारिक स्पष्टतेमुळे अधिक आहे. इराणच्या या अडेखोरपणाला काही मर्यादाही आहेत. केवळ सांस्कृतिक अभिमानावर पोट भरता येत नाही, हे वास्तव तिथल्या कोसळणाऱ्या चलनावरून आणि वाढत्या महागाईवरून स्पष्ट होते.

आज इराण हा एका अशा वळणावर उभा आहे जिथे त्याला आपल्या 'सांस्कृतिक जपणुकी'साठी 'आर्थिक व्यवहार्यते'चा बळी द्यावा लागत आहे. जर या देशात बदल घडवायचा असेल, तर तो बाहेरून लादलेल्या युद्धाने घडणार नाही, तर तो तिथल्या अंतर्गत सांस्कृतिक घुसळणीतूनच घडेल.

इराण हा केवळ एक देश नसून तो एक 'विचार' आहे. हा विचार कधी अण्वस्त्रांच्या रूपात जगाला घाबरवतो, तर कधी आपल्या प्राचीन कविता आणि कलेच्या माध्यमातून थक्क करतो. इराणचे न कोसळणे हे जागतिक लोकशाहीसाठी आव्हान असले, तरी ते सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या ताकदीचे एक मोठे उदाहरण आहे. जोपर्यंत जगाला इराणची ही 'पर्शियन नस' सापडत नाही, तोपर्यंत इराणचे हे सांस्कृतिक कोडे सुटणे अशक्य आहे.

# स्वीकृत नगरसेवकांची निवड पुन्हा लांबणीवर

## इच्छुकांची धाकधूक वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची निवड सोमवारी (दि. २०) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत अपेक्षित होती. मात्र सभा तहकूब झाल्याने ही निवड पुन्हा पुढे ढकलली गेली आहे. त्यामुळे इच्छुकांमध्ये अनिश्चितता आणि धाकधूक वाढली आहे.



शेजारच्या पुणे महापालिकेत भाजपच्या स्वीकृत नगरसेवकांची यादी ९ मार्च २०२६ रोजी जाहीर होऊन निवड प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. मात्र पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या स्थानिक नेते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये एकमत न झाल्याने हा प्रश्न अद्याप रखडलेलाच आहे. सात जागांसाठी तब्बल तीनशेहून अधिक इच्छुकांनी अर्ज केल्याने निवड प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची बनली आहे. परिणामी, शहर भाजपाने अंतिम निर्णय प्रदेश समितीकडे सोपवला आहे.

भाजपमध्ये जुने-नवे, आमदार समर्थक आणि निष्ठावंत असे गट पडल्याने अंतर्गत संघर्षही उघड झाला आहे. आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे या प्रमुख गटांनी आपल्या समर्थकांची नावे पुढे केली आहेत. याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांकडूनही काही नावे सुचवण्यात आली आहेत. त्यामुळे कोणाला संधी द्यायची, यावर एकमत होत नसल्याचे चित्र आहे.

दरम्यान, दहा स्वीकृत नगरसेवकांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन नावांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट होता. माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा सावळे आणि फजल शेख यांची निवड ४ मार्च २०२६ रोजीच करण्यात आली आहे. मात्र, या नावांना अद्याप सभेची अधिकृत मंजुरी मिळालेली नाही. सत्ताधारी भाजपमुळे ही प्रक्रिया रखडल्याचे सांगितले जाते.

भाजपाकडून सात नावांवर एकमत झाल्याचा दावा सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी यापूर्वी केला होता. त्यामुळे या सभेत निवड होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र सभा तहकूब झाल्याने हा निर्णय पुन्हा पुढे ढकलला गेला आहे. आता ५ मे रोजी होणाऱ्या तहकूब सभेकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

# सामाजिक समता सप्ताहाचा समारोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे आयोजित सामाजिक समता सप्ताह आणि ‘विचार प्रबोधन पर्व २०२६’ची सांगता सुरेल संगीत आणि भीम गीतांच्या प्रभावी सादरीकरणात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला होता. सप्ताहभर विविध प्रबोधनात्मक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांद्वारे



नागरिकांमध्ये समतेच्या विचारांची जागर करण्यात आली.

समारोप प्रसंगी प्रसिद्ध गायक अभिजित कोसंबी यांनी भीम गीतांच्या सादरीकरणातून वातावरण भारावून टाकले. त्यांच्या आवाजातील ऊर्जा आणि भावनेमुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. याशिवाय मेघानंद जाधव आणि मधुकर कदम यांनीही आपल्या सादरीकरणातून कार्यक्रमाची रंगत वाढवली. या तिन्ही कलाकारांनी आपल्या गीतांमधून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला. कार्यक्रमादरम्यान प्रेक्षकांचा सहभागही उत्स्फूर्त होता.

# अवजड वाहनांवर कारवाईचा बडगा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरात नियमबाह्य पद्धतीने होणाऱ्या अवजड वाहनांच्या प्रवेशामुळे वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या घटनांचा विचार करून वाहतूक विभागाने कठोर कारवाई सुरू केली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांकडून तब्बल ३ कोटी २ लाख ९८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने अवजड वाहनांच्या शहरातील प्रवेशावर ठराविक वेळेत निर्बंध घातले आहेत. सकाळी ८ ते दुपारी १२ आणि सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत अवजड वाहनांना शहरात प्रवेश करण्यास मनाई आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन होत असल्याने विशेष मोहिमा राबवून कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक विभागाच्या आकडेवारीनुसार, एकूण १० हजार ५३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यातून १ कोटी ३७ लाख १८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यात सर्वाधिक कारवाई करण्यात आली आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतूक व्यवस्थापन हे मोठे आव्हान बनले आहे. त्यामुळे कोंडी कमी करणे आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करणे या उद्देशाने उपाय केले जात आहेत.

नागरिकांच्या मते, अशा प्रकारच्या कारवाईमुळे विशेषतः शाळा आणि कार्यालयीन वेळेत होणारी गर्दी काही प्रमाणात नियंत्रणात येऊ शकते.

# समग्र महात्मा फुले परिसंवादातून परिवर्तनाचा वेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा आजच्या काळातील संदर्भ अधोरेखित करत ‘समग्र महात्मा फुले’ या परिसंवादात समाजपरिवर्तनाचा सखोल वेध घेण्यात आला. शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, जातीभेद निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांवर आधारित समाजरचनेची गरज यावेळी ठळकपणे मांडण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह




व ‘विचार प्रबोधन पर्व २०२६’ अंतर्गत या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. समारोप कार्यक्रमात झालेल्या या चर्चासत्रात विविध मान्यवरांनी फुले यांच्या कार्याचा, साहित्याचा आणि विचारांचा आढावा घेतला. परिसंवादात साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड आणि प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी सहभाग घेतला. यावेळी उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या साहित्य आणि कार्यातून घडलेल्या समाजप्रबोधनावर प्रकाश टाकला. ‘शेतकऱ्याचा असूड’, ‘सार्वजनिक सत्यधर्म’ आणि ‘गुलामगिरी’ यांसारख्या ग्रंथांमधून त्यांनी तत्कालीन व्यवस्थेवर केलेल्या प्रखर टीकेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शिक्षणक्रांती, स्त्री-सक्षमीकरण आणि अस्पृश्यतेविरुद्धचा लढा या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख झाला. या परिसंवादातून महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा परस्पर संबंध आणि आजच्या समाजासाठी त्यांची उपयुक्तता स्पष्ट करण्यात आली.

# आजोबांच्या सतर्कतेमुळे डिजिटल अरेस्टमधून सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एका ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या प्रसंगावधानामुळे एक तरुण दांपत्य 'डिजिटल अरेस्ट' नावाच्या मोठ्या सायबर फसवणुकीतून थोडक्यात बचावले आहे. सायबर भामट्यांनी उकळलेले १२ लाख रुपये ज्येष्ठ नागरिकाच्या सतर्कतेमुळे पोलिसांच्या मदतीने वाचवण्यात यश आले.

रविवारी दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजताच्या सुमारास निगडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहणाऱ्या एका तरुणाला व्हॉट्सॲपवर एक कॉल आला. समोरच्या




व्यक्तीने आपण 'मुंबई पोलीस क्राईम ब्रांच'मधून बोलत असल्याचे सांगितले. "तुमच्या नावाचे एक पार्सल पकडण्यात आले असून, त्यामध्ये एम.डी. ड्रग्ज आणि ५ वेगवेगळे पासपोर्ट सापडले आहेत. त्यामुळे तुम्हाला चौकशीला सामोरे जावे लागेल," अशी भीती त्याला घालण्यात आली. भामट्यांनी त्या तरुणाला आणि त्याच्या पत्नीला 'सिग्नल' नावाचे ॲप डाऊनलोड करायला लावून व्हिडिओ कॉलवर राहण्यास भाग पाडले. कॉलवर पोलीस गणवेशातील बनावट अधिकारी दाखवून त्यांना २४ तास डिजिटल अरेस्ट केले. सोमवारी दुपारी २:३० वाजेपर्यंत हा प्रकार सुरू होता. भामट्यांनी या दांपत्याकडे १२ लाख रुपयांची मागणी केली. घाबरलेल्या तरुणाने आपल्या म्युच्युअल फंडातून १२ लाख रुपये काढून स्वतःच्या बँक खात्यावर जमा केले आणि तो भामट्यांना पैसे पाठवणार होता. मात्र, संशय आल्याने त्याने आपला मोबाईल फोन दूर ठेवून ही हकीकत आपले वडील (८१ वर्षे) यांना सांगितली. वडिलांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ सायबर पोलीस ठाण्यातील अंमलदार सोपान बोधवड यांच्याशी संपर्क साधला. बोधवड यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले आणि निगडी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस अंमलदार स्नेहा म्हस्के व सहकाऱ्यांसह त्या तरुणाचे घर गाठले. पोलिसांनी पीडित दांपत्याला हा प्रकार 'डिजिटल अरेस्ट' नावाचा सायबर गुन्हा असल्याचे समजावून सांगितले आणि त्यांची फसवणूक होण्यापासून वाचवले. पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की: 'डिजिटल अरेस्ट' नावाची कोणतीही संकल्पना कायद्यात अस्तित्वात नाही. कोणताही पोलीस अधिकारी किंवा तपास यंत्रणा व्हिडिओ कॉलद्वारे कोणालाही नजरकैदेत ठेवत नाही. असा संशयास्पद कॉल आल्यास न घाबरता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा डायल ११२ वर संपर्क साधावा. सायबर फसवणूक झाल्यास १९३० या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी.

**सराईत गुन्हेगाराला अटक**

**चाकण :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध धंदे चालवणाऱ्यांविरुद्ध पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कडक मोहिमेचे आदेश दिले आहेत. याच मोहिमेअंतर्गत, दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका आणि जुगार चालवणाऱ्या रफिक शगीर काझी याच्यावर 'एमपीडीए' कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. त्याची रवानगी अमरावती मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली. रफिक शगीर काझी (वय ३९ वर्षे, रा. काझीवाडा, महात्मा फुले चौक, चाकण) महाळुंगे आणि परिसरात जुगाराचे अड्डे चालवत होता. त्याच्यावर १८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. काझी याच्या वाढत्या कारवायांना आळा घालण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव तयार केला. पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर आणि महाळुंगे विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव पोलीस आयुक्तांकडे पाठवण्यात आला होता.

# परमिटपेक्षा जास्त रिक्षांची नोंदणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** औद्योगिकनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिकच तीव्र होत आहे. त्यातच आता ऑटो रिक्षांच्या नोंदणीबाबत धक्कादायक बाब समोर आली आहे. शहरात वितरित केलेल्या परमिटपेक्षा जास्त रिक्षांची नोंदणी झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

कायद्यानुसार एका परमिटवर एकच रिक्षा नोंदणी होणे अपेक्षित आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नोंदीनुसार शहरात ४७ हजार ५०० परमिट वितरित करण्यात आले असताना तब्बल ४८ हजार १५० रिक्षांची नोंदणी झाली आहे. त्यामुळे नियमांची अंमलबजावणी आणि देखरेख यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना खासगी वाहतुकीची गरज लक्षात घेऊन परिवहन विभागाकडून रिक्षा परमिट दिले जातात. मोटार वाहन कायद्याअंतर्गत ही प्रक्रिया राबवली जाते. २०१७ पासून वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर नव्या रिक्षांना परवाने देण्यास सुरुवात झाली. अनेकांनी व्यवसाय म्हणून रिक्षा खरेदी करून परमिट घेतले.

शहरातील रिक्षांची वाढती संख्या लक्षात घेऊन विविध रिक्षा संघटनांनी नव्या परमिटवर बंदी घालण्याची मागणी केली होती. तरीही, परमिटपेक्षा जास्त रिक्षा रस्त्यावर असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी एका परमिटवर अनेक रिक्षांची नोंदणी झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या होत्या.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### हॉटेलमध्ये शस्त्रांसह धुडगूस; दोघांना अटक

**लोणी काळभोर :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील "माईलस्टोन ०९" हॉटेलमध्ये रविवारी (दि. १९) पहाटे दोनच्या सुमारास चार जणांनी पिस्टल व धारदार शस्त्रे हातात घेऊन जबरदस्तीने प्रवेश करत दहशत निर्माण केल्याची घटना घडली आहे. "निलेश काळभोरचा आज गेम वाजवायचा होता" अशी धमकी देत आरोपींनी हॉटेलमध्ये आरडाओरड, शिवीगाळ करत राडा घातल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून खंडणी विरोधी पथकाने तात्काळ कारवाई करत दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे प्रणवराज सुनील यादव (वय २५, रा. मांजरी बुद्रुक) आणि जय गणेश शेलार (वय २५, रा. हडपसर) अशी आहेत. हॉटेल व्यावसायिक सूर्यकांत बापुसाहेब उंद्रे (वय ४०, रा. मांजरी खुर्द) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

### सोन्याच्या कर्जाच्या आमिषाने फसवणूक

**हडपसर :** सोन्याच्या कर्जाच्या आमिषाने एका महिलेची तब्बल २८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयेशा मशीद परिसरातील महिलेने वैद्यकीय अडचणीमुळे आर्थिक गरज भागवण्यासाठी जून २०२५ मध्ये २१ तोळे सोने 'मॅग फायनान्स' येथे गहाण ठेवून सुमारे ११ लाख ५१ हजारांचे कर्ज घेतले होते. यानंतर अधिक कर्जाची गरज भासल्याने संबंधित फायनान्स कंपनीतील कर्मचाऱ्याने मोहसीन मंजूर आलम पठाण याचा संपर्क दिला. आरोपीने कमी व्याजदरात अधिक कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत महिलेचा विश्वास संपादन केला. यानंतर विविध कारणे सांगत आरोपीने महिलेची फसवणूक केल्याचे उघड झाले असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे निर्देश

# विकासकामांत पारदर्शकता व दर्जा राखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर :** घोडेगाव येथील पंचायत समितीच्या हुतात्मा बाबू गेणू सभागृहात आंबेगाव तालुका समन्वय समितीची बैठक माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेत विकासकामांमध्ये पारदर्शकता राखण्याचे व दर्जेदार कामांवर सतत देखरेख ठेवण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

शासनाकडून मिळणारा निधी पारदर्शकपणे खर्च करून कामांची गुणवत्ता अबाधित ठेवावी. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा, अशी सूचना त्यांनी केली. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचेही त्यांनी बजावले.

तालुक्यातील कुपोषणाचा प्रश्न गंभीर असून आरोग्य व महिला-बालकल्याण विभागाने विशेष लक्ष देऊन तालुका कुपोषणमुक्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी काफरी झेंडू लागवडीसाठी विशेष योजना तयार करण्याचे निर्देश देत या पिकासाठी अनुदान मिळवून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपजिल्हा रुग्णालय मंचर, ग्रामीण रुग्णालय घोडेगाव, आरोग्य विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, महावितरण, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व कृषी विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीपूर्वी सर्व अधिकाऱ्यांची हजेरी घेऊन अनुपस्थितांबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच प्रतिनिधी म्हणून उपस्थित कर्मचाऱ्यांची नोंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. पुढील बैठकीत सर्व विभागांनी कार्यपूर्तीचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील, असेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, सभापती कैलास बुवा काळे, उपसभापती ज्योती पारधी, तहसीलदार सचिन वाघ, गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका, वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले, पोलीस निरीक्षक सागर पवार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## उन्हाच्या झळांत कांदा काढणी शेतकरी महिलांची कसरत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, लाखणगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी परिसरात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून कांदा काढणीची लगबग सुरू झाली आहे. तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले असून आभाळी वातावरणामुळे उन्हाचा तडाखा अधिकच जाणवत आहे.

अशा कडाक्याच्या उन्हातही शेतकरी महिला शेतात काम करताना दिसत आहेत. उन्हापासून बचावासाठी डोक्यावर छत्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून त्यामुळे शेतात रंगीबेरंगी दृश्य दिसत आहे.

कांद्याचे दर वाढल्यानंतर टीका करणाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतीत उतरून कांदा पिकवण्यासाठी लागणारी मेहनत आणि खर्च अनुभवावा, असे मत शिरदाळे येथील प्रगतशील शेतकरी संदीप तांबे यांनी व्यक्त केले.

## राजगुरुनगरच्या आखाड्यात १२० पैलवान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** भोपळबुवा महाराज आणि सिद्धेश्वर महाराज यात्रेनिमित्त रविवारी (दि. १९) आयोजित कुस्ती स्पर्धा उत्साहात पार पडल्या. मामासाहेब मोहोळ कुस्ती मैदानावर झालेल्या या आखाड्यात तब्बल १२० पैलवानांनी सहभाग नोंदवत स्पर्धेला रंगत आणली.

यामध्ये ११० पुरुष आणि १० महिला पैलवानांचा समावेश होता. तालुक्यातील नामांकित कुस्तीपटूंना या निमंत्रित कुस्त्यांमुळे मोठे व्यासपीठ मिळाले. अंतिम लढतीत जय हनुमान तालीम, सोलापूरचा शाहरुख खान याने पुण्यातील काका पवार तालीमच्या रामा कांबळे याच्यावर मात करत "राजगुरू मानाची गदा" हा किताब पटकावला. विजेत्या पैलवानांसाठी १ हजार ते दीड लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे ठेवण्यात आली होती. कुस्ती आखाड्याचे उद्घाटन ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, माजी जि. प. सदस्य अतुल देशमुख आणि यात्रा कमिटीचे अध्यक्ष हिरामण सातकर यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, नगरसेवक मित्रसेन डोंगरे, फैज मोमीन, वस्ताद मुन्ना शेख, दिलीप मेदगे, संदीप वाडेकर, राहुल पिंगळे, राहुल आढारी, खंडू थिगळे, नरेंद्र थिगळे, गणेश थिगळे, बापू थिटे, महाराष्ट्र कुस्ती चॅम्पियन अरुण खेंगले, खेड केसरी शुभम कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कुस्ती पंच म्हणून वस्ताद मुन्ना शेख, योगेश काळे, महेंद्र सातकर, युसूफ शेख आणि प्रतिकेश सातकर यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन अक्षय मुळुक व प्रकाश घोलप यांनी केले.

या आखाड्यात रुद्रप्रताप साबळे, मोहित भारती, भूषण सावंत आणि अभि थिगळे यांनी प्रभावी कामगिरी करत कुस्ती शौकिनांची मने जिंकली. राजगुरुनगर यात्रा कमिटी आणि जय बजरंग तालीम, खेड यांनी स्पर्धेचे आयोजन केले.

## भीमाशंकरचे मिल रोलरचे पूजन उत्साहात

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर हंगामाच्या पूर्वतयारीला प्रारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीला सुरुवात झाली असून, मशिनरी ओव्हरऑयलिंगनंतर मिल रोलरचे पूजन रविवारी (दि. १९) अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले. चेअरमन बाळासाहेब बेंडे, व्हाइस चेअरमन प्रदीप वळसे पाटील आणि संचालक मंडळाच्या हस्ते पूजन करून प्रत्यक्ष जोडणी कामाला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी संचालक अशोक घुले, रामचंद्र ढोबळे, बाबासाहेब खालकर, शांताराम हिंगे, आनंदराव शिंदे, मच्छिंद्र गावडे, बाजीराव बारवे, ज्ञानेश्वर अस्वारे, रामहरी पोंदे, संचालिका पुष्पलता जाधव, प्रिया बाणखेले, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, जनरल मॅनेजर (टेक्निकल) शिरीष सुर्वे, सेक्रेटरी रामनाथ हिंगे, मुख्य शेतकी अधिकारी दिलीप कुरकुटे, डिस्टिलरी मॅनेजर प्रतापसिंह सावंत, कामगार कल्याण अधिकारी सुरेश शिंदे, सिव्हिल इंजिनिअर अमीर पठाण, पर्चेस अधिकारी ब्रिजेश लोहोट, सुरक्षा अधिकारी कैलास गाढवे व कर्मचारी उपस्थित होते.

चेअरमन बेंडे यांनी सांगितले की, येत्या गाळप हंगामासाठी मशिनरी दुरुस्ती व ओव्हरऑयलिंगची कामे सुरू असून ती वेळेत पूर्ण करून ऑक्टोबरपर्यंत कारखाना सज्ज ठेवण्याचे नियोजन आहे. संस्थापक माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस तोडणी व वाहतूक व्यवस्थेचे करारही सुरू करण्यात आले आहेत.

इच्छुकांनी विभागीय शेतकी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. व्हाइस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्यास गाळपासाठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## खामुंडी परिसरात कांदा काढणीला वेग

नीचांकी दरामुळे शेतकरी अडचणीत




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** खामुंडी (ता. जुन्नर) परिसरात कांदा काढणीला वेग आला असून तीव्र उन्हात शेतमजूर काढणीचे काम करत आहेत. डोक्यावर तडाखेबंद ऊन असतानाही उदरनिर्वाहासाठी दिवसभर कष्ट करावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

एकरी सुमारे ७० ते ८० हजार रुपये खर्च येणाऱ्या कांदा पिकाला मात्र अत्यंत कमी बाजारभाव मिळत आहे. ओतूर उपबाजारात रविवारी (दि. १९) १८ हजार ५५५ पिशव्यांची आवक झाली. गोळा कांद्याला केवळ ११ ते १२ रुपये प्रतिकिलो दर मिळाल्याची माहिती बाजार समितीचे व्यवस्थापक दीपक मस्करे यांनी दिली. अवकाळी पावसाची भीती आणि भविष्यात दर वाढतील या आशेने शेतकरी कांदा चाळीत साठवण्यावर भर देत आहेत. मात्र कर्जावरील व्याज वाढत असताना बाजारभावाबाबत अनिश्चितता कायम आहे.

सध्याच्या ११ ते १२ रुपयांच्या दरात उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. असेच दर राहिल्यास शेती व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## आंबेगाव तालुक्यातील शासकीय कर्मचारी बेमुदत संपावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ आंबेगाव तालुक्यातील शासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मंगळवारपासून (दि. २१) बेमुदत संपावर जाणार असल्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना, आंबेगाव तालुक्याच्या वतीने प्रभारी तहसीलदार सचिन वाघ यांना देण्यात आले.

जुन्या पेन्शन योजनेच्या धर्तीवर सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू करणे, रिक्त पदांची तातडीने भरती करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे तसेच वेतन व भत्त्यातील विसंगती दूर करणे अशा विविध मागण्यांसाठी सरकारशी वारंवार चर्चा करूनही ठोस निर्णय झालेला नाही. सन २०२३ मधील आंदोलनानंतर दिलेल्या




आश्वासनांची अंमलबजावणीही अद्याप झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारपासून बेमुदत संप सुरू होणार असून, त्यामुळे प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी आंबेगाव तालुका महसूल संघटनेचे अध्यक्ष किशोर उल्हारे, जयश्री डामसे-भवारी, निखिल खानविलकर, ए. एन. बनसोडे, अंकुश राक्षे, सिताराम सुपे, नंदकुमार तारडे, प्रवीण देवकर आदी उपस्थित होते.

## हिवरे खुर्द शाळेत शिक्षकांचा कार्यगौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरे खुर्द येथे इयत्ता पहिलीचा शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता सातवीचा सदिच्छा समारंभ आणि बदली झालेल्या शिक्षकांचा कार्यगौरव सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोहिदास जाधव होते.




कार्यक्रमप्रसंगी गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे, केंद्रप्रमुख रविंद्र कुटे, सरपंच मनेश बर्डे, उपसरपंच लक्ष्मण वायकर, शिक्षक नेते सत्यवान म्हस्के, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक मच्छिंद्र भोर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सागर वायकर, उपाध्यक्षा दिपाली जाधव, संतोष शिर्के, अन्वर शेख, वर्षा बर्डे, तारामती वायकर, शितल वाघचौरे, हिना शेख तसेच अंगणवाडी सेविका अलका घोलप, सपना औटी, शैला येंधे, सुवर्णा बेनके आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ग्रामस्थ, पालक व विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इयत्ता पहिलीचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन विद्यार्थ्यांचे फेटा बांधून स्वागत करून शालेय साहित्य, गुलाबपुष्प व खाऊ देण्यात आला.

यावेळी शाळेतून बदली झालेल्या सुरेखा विजय नवले आणि सीमा चंद्रकांत जाधव या शिक्षिकांचा सन्मानपत्र, शाल व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला. नवले यांनी शाळेबद्दल भावनिक मनोगत व्यक्त केले, तर जाधव यांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन विकास मटाले, सुरेखा म्हस्के व वर्षा जाधव यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अन्वर सय्यद यांनी केले, सूत्रसंचालन निलेश सरोदे यांनी केले तर आभार गुणवंतराव इंगळे यांनी मानले.

प्रभाग फेररचनेचा मुद्दा केंद्रस्थानी आला

# ७५४ ग्रामपंचायतींच्या फेररचनेने वातावरण तापले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** देशभर 'नारीशक्ती वंदन' घटनादुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू असताना पुणे जिल्ह्यात ७५४ ग्रामपंचायतींच्या प्रभाग फेररचनेचा मुद्दा केंद्रस्थानी आला आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांवर या फेररचनेचा थेट परिणाम होणार असल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

अलीकडेच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी



काँग्रेस (अजित पवार गट) आघाडीवर राहिला, तर भाजप दुसऱ्या क्रमांकावर होता. अनेक ठिकाणी अजित पवार गट आणि शरद पवार गट एकत्र लढल्याने राष्ट्रवादीला फायदा झाला. शिवसेना (ठाकरे गट) तिसऱ्या स्थानावर राहिला, तर काँग्रेसला अपेक्षित यश मिळू शकले नाही. त्यामुळे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व कायम असल्याचे चित्र दिसून आले.

डिसेंबर महिन्यात पुणे जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपणार आहे. त्याआधी प्रभागांची फेररचना करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. लोकसंख्या वाढ, भौगोलिक बदल आणि प्रशासकीय सोयी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने प्रारूप मसुदा तयार केला आहे. या मसुद्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्या असून लवकरच अंतिम आराखडा राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला जाणार आहे. या फेररचनेत पुणे शहरालगतच्या भागांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. हवेली तालुक्यातील २३ गावांचा पुणे महापालिकेत समावेश झाल्याने त्या परिसरातील ग्रामपंचायतींची रचना पूर्णपणे बदलणार आहे. यामुळे स्थानिक सत्तासमीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तालुकानिहाय पाहता, मुळशीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने चांगली कामगिरी केली असली तरी हिंजवडी परिसरात भाजपने आपली उपस्थिती दाखवून दिली आहे. त्यामुळे येथे भाजप आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पुरंदर आणि भोरमध्ये काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप आणि संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय समीकरणे बदलली असून ग्रामपंचायतींच्या माध्यमातून भाजपला नवे संधीक्षेत्र मिळू शकते.

मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने मोठे यश मिळवत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत वर्चस्व राखले आहे, तर इंदापूर आणि दौंडमध्येही राष्ट्रवादीला चांगली कामगिरी करता आली. मात्र या सर्व भागांत भाजप नव्याने संघटन उभारणीवर भर देत असून फेररचनेच्या माध्यमातून आपली स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.


भाजपकडून प्रभाग रचनेत बदल झाल्यास काही ठिकाणी नव्या जागा आणि संधी निर्माण होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या प्रक्रियेकडे सर्वच पक्षांचे बारकाईने लक्ष लागले आहे.

## स्पर्धा परीक्षेत खडकवाडी शाळेचे भरीव यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** खडकवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एनएसएसई, अभिरूप आणि मंथन स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांपैकी तब्बल १६ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत, १७ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर ११ विद्यार्थ्यांनी केंद्र गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. या यशाबद्दल खडकवाडी ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी संघटना तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या विद्यार्थ्यांना भाऊसाहेब वाळुंज, समीर जाधव, प्रज्ञा नाटे आणि तनुजा पडवळ यांनी मार्गदर्शन केले. अशी माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेखर सुक्रे यांनी दिली.

## सारांश वृत्त

### फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट

**थ्रिसूर:** या जिल्ह्यातील मुंडाथिकोड येथील फटाके निर्मिती कारखान्यात मंगळवारी झालेल्या स्फोटात अनेक कामगार भाजले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आगामी त्रिशूर पूरमच्या निमित्ताने एका मंदिराच्या देवस्वमतर्फे फटाके तयार केले जात असलेल्या एका शेडमध्ये हा अपघात घडला. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. राज्याच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी अधिकाऱ्यांना जखमींवर विशेष उपचार सुनिश्चित करण्याचे आणि त्रिशूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

### रांचीमध्ये वस्त्रोद्योग कामगारांचे आंदोलन

**रांची** : पगार मिळण्यास होणाऱ्या विलंबाच्या निषेधार्थ, रांचीमधील एका कपड्यांची निर्यात करणाऱ्या कंपनीच्या एक हजाराहून अधिक कामगारांनी, ज्यात बहुतांशी महिला होत्या, मंगळवारी कारखान्याच्या प्रवेशद्वाराबाहेर निदर्शन केले. या आंदोलनामुळे खेळगाव-तातिसिलवे रस्त्यावरील वाहतूक सुमारे चार तास विस्कळीत झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कामगारांपैकी एक असलेल्या ज्योती देवी यांनी आरोप केला आहे की, त्यांना फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा पगार मिळालेला नाही.



### लातेहार जंगलात दोन महिला मृत

**लातेहार** : झारखंडच्या लातेहार जिल्ह्यातील जंगलात मंगळवारी सकाळी दोन महिला मृतावस्थेत आढळल्या, अशी माहिती पोलिसांनी दिली. गुरिकम जंगलात एका जंगली गव्याने हल्ला केल्याने त्या महिलांचा मृत्यू झाला, असे सांगण्यात आले. वनक्षेत्र अधिकारी अजय तोप्पो यांनी सांगितले की, कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्या महिला सोमवारी सकाळी जंगलात फुले आणायला गेल्या होत्या, पण घरी परतल्या नाहीत.

## बंददरम्यान हिंसक चकमकी, तणाव शिगेला

# मणिपूरमध्ये नागा–कुकी संघर्ष भडकला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इम्फाळ** : मणिपूरमध्ये नागा आणि कुकी समुदायांमधील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला असून, बंदच्या पार्श्वभूमीवर झालेल्या हिंसक चकमकींमुळे राज्यातील परिस्थिती पुन्हा चिंताजनक बनली आहे.

सेनापती आणि कांगपोकपी जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात दोन्ही गट आमनेसामने आल्याने दगडफेक, मारामाऱ्या आणि काही ठिकाणी गोळीबाराच्या घटनाही घडल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रशासनाने संवेदनशील भागात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

उखरूल जिल्ह्यात दोन नागा नागरिकांच्या हत्येच्या निषेधार्थ युनायटेड नागा कौन्सिलने पुकारलेल्या बंददरम्यान हा संघर्ष भडकला. बंद पाळण्यासाठी रस्ते रोखण्याच्या प्रयत्नांदरम्यान नागा आणि कुकी गटांमध्ये वाद निर्माण झाला आणि त्याचे रूपांतर हिंसाचारात झाले. काही भागांत वाहनांची तोडफोड करण्यात आली, तर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संघर्षाचा परिणाम म्हणून नागा बहुल भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून बाजारपेठा, शाळा आणि शासकीय कार्यालयांवरही त्याचा परिणाम दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याचे चित्र आहे.

मणिपूरमधील नागा–कुकी संघर्षाला दीर्घ इतिहास आहे. जमीन हक्क, प्रादेशिक वर्चस्व आणि राजकीय प्रतिनिधित्व या मुद्द्यांवरून या दोन समुदायांमध्ये अनेक वर्षांपासून तणाव आहे. २०२३ पासून राज्यात जातीय हिंसाचाराची मालिका सुरू असून, हजारो लोकांना विस्थापित व्हावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर सध्याच्या घटना अधिक गंभीर मानल्या जात आहेत.

दरम्यान, राज्य प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने पावले उचलली आहेत. संवेदनशील भागात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून, दोन्ही समुदायांच्या नेत्यांशी संवाद साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मणिपूरमधील नागा–कुकी संघर्ष पुन्हा तीव्र होत असल्याचे चित्र दिसत असून, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी संवाद आणि समन्वय हाच पर्याय असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# बंगाल निवडणुकीत २३ टक्के उमेदवारांवर गुन्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात उभ्या असलेल्या उमेदवारांपैकी सुमारे २३ टक्के उमेदवारांवर गुन्हेगारी खटले दाखल असल्याची माहिती असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या अहवालातून समोर आली आहे. तसेच २२ टक्के उमेदवार कोट्यधीश असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

एडीआरने एकूण १,४४५ उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले. त्यात ३३८ उमेदवारांनी (२३ टक्के) स्वतःवर गुन्हेगारी खटले असल्याचे जाहीर केले, तर २९५ उमेदवारांवर (२० टक्के) गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यामध्ये १६ उमेदवारांवर खुनाचे, तर ८० उमेदवारांवर खुनाच्या प्रयत्नाचे आरोप असल्याचे उघड झाले. प्रमुख पक्षांमध्ये भारतीय जनता पक्षच्या १४१ पैकी १०२ (७२ टक्के), तृणमूल काँग्रेसच्या १४२ पैकी ४९ (३५ टक्के), कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी)च्या १०० पैकी ५१ (५१ टक्के) आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १४२ पैकी ३७ (२६ टक्के) उमेदवारांनी गुन्हेगारी प्रकरणे जाहीर केली आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतरही सुमारे ७० टक्के उमेदवारांना पक्षांकडून उमेदवारी देण्यात येत आहे. १४२ मतदारसंघांपैकी ६३ (४४ टक्के) मतदारसंघ 'रेड अलर्ट' म्हणून ओळखले गेले आहेत.

संपत्तीच्या बाबतीत, १,४४५ पैकी ३२१ (२२ टक्के) उमेदवारांकडे १ कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्ता आहे. पक्षनिहाय पाहता, तृणमूल काँग्रेसच्या १४२ पैकी १०३ (७३ टक्के), भाजपच्या १४१ पैकी ७३ (५२ टक्के), काँग्रेसच्या १४२ पैकी ३६ (२५ टक्के) आणि सीपीआय(एम)च्या १०० पैकी ३३ (३३ टक्के) उमेदवार कोट्यधीश आहेत.

प्रति उमेदवार सरासरी मालमत्ता १.२१ कोटी रुपये असून, तृणमूल काँग्रेसचे उमेदवार सर्वाधिक श्रीमंत असल्याचे दिसून आले. त्यांच्या उमेदवारांची सरासरी मालमत्ता ५.०५ कोटी रुपये आहे.

# ओबीसी, मुस्लिम महिलांसाठी विधेयक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महिला आरक्षणाच्या कायद्यात ओबीसी आणि मुस्लिम महिलांसाठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करण्याची मागणी समाजवादी पक्ष संसदेत खासगी विधेयकाद्वारे मांडणार असल्याची माहिती आझमगडचे खासदार धर्मेंद्र यादव यांनी दिली.

यादव यांनी स्पष्ट केले की, २०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण कायद्यात ओबीसी आणि मुस्लिम महिलांच्या प्रतिनिधित्वाबाबत कोणतीही ठोस तरतूद नाही. "हीच या कायद्याची सर्वात मोठी उणीव आहे. त्यामुळे सर्व घटकांना न्याय मिळावा, यासाठी खासगी विधेयक आणण्याची तयारी सुरू आहे," असे ते म्हणाले. संसदीय नियमांनुसार, मंत्री नसलेला कोणताही खासदार 'खासगी सदस्य' म्हणून विधेयक सादर करू शकतो. अशा विधेयकांद्वारे सरकारच्या विधेयकांच्या कक्षेबाहेरील सार्वजनिक मुद्दे मांडले जातात. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीत होत असलेल्या विलंबावरून यादव यांनी केंद्र सरकारवर टीका केली. "विरोधकांनी २०२३ मध्ये या कायद्याला पाठिंबा दिला होता. मात्र, त्याची अंमलबजावणी आणि अधिसूचना काढण्यात सरकारने विलंब केला," असा आरोप त्यांनी केला. तसेच, संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक २०२६ या विधेयकाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. जम्मू-काश्मीर आणि आसाममधील पुनर्रचना प्रक्रियेचा संदर्भ देत, "या निर्णयांमुळे विरोधी पक्षांचा विश्वास कमी झाला असून, सरकारच्या हेतूंवर प्रश्न निर्माण झाले आहेत," असे ते म्हणाले. यादव यांनी पुनरुच्चार केला की, समाजवादी पक्षाने नेहमीच महिला आरक्षणाला पाठिंबा दिला आहे. मात्र, "आरक्षणाची अंमलबजावणी सर्व समाजघटकांतील महिलांसाठी समानतेने झाली पाहिजे," अशी भूमिका त्यांनी मांडली.

# भक्ताला देवाचा स्पर्श नाकारणे घटनाबाह्य नाही का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : "देशाचे संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून ते नागरिकांच्या श्रद्धेचेही रक्षणकर्ते आहे. जर एखाद्या भक्ताला त्याच्या आराध्य देवतेच्या मूर्तीला स्पर्श करण्यापासून केवळ परंपरेच्या नावाखाली रोखले जात असेल, तर अशा वेळी संविधान त्या भक्ताची सुटका करण्यासाठी धावून येणार नाही का?" असा अत्यंत मूलभूत आणि ऐतिहासिक प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने आज उपस्थित केला. या टिप्पणीमुळे देशातील धार्मिक स्थळांवरील 'स्पर्श' आणि 'प्रवेश' यांच्या अधिकारावर पुन्हा एकदा मोठी कायदेशीर चर्चा सुरू झाली आहे.

एका विशिष्ट देवस्थानातील जुन्या परंपरेनुसार, केवळ ठराविक वर्गातील पुजारी किंवा व्यक्तींनाच गाभाऱ्यात जाऊन मूर्तीला स्पर्श करण्याची परवानगी आहे. सामान्यांना मात्र दुरूनच दर्शन घ्यावे लागते. या प्रथेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने मंदिर प्रशासनाला आणि प्रतिवाद्यांना धारेवर धरले. खंडपीठाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने म्हटले की, "एखादा भक्त जो अंतःकरणापासून देवाची भक्ती करतो, त्याच्यासाठी देवाला स्पर्श करणे हा त्याच्या उपासनेचा अविभाज्य भाग असू शकतो. अशा स्थितीत केवळ ठराविक लोकांची मक्तेदारी असणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वाशी विसंगत ठरते."

न्यायालयाने असेही विचारले की, "जर एखाद्या भक्ताचे मूलभूत धार्मिक अधिकार डावलले जात असतील, तर न्यायालय गप्प कसे बसू शकते? संविधानाचे कलम २५ हे प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देते, मग त्यात भक्ताला देवापासून दूर ठेवणाऱ्या परंपरांना स्थान आहे का?" मंदिर प्रशासनाच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रत्येक धार्मिक स्थळाचे स्वतःचे 'आगम' शास्त्र आणि विशिष्ट विधी असतात. मूर्तीची शुद्धता आणि पावित्र्य जपण्यासाठी सर्वांना स्पर्श करण्याची परवानगी देता येत नाही. गर्दीचे व्यवस्थापन आणि शांतता राखण्यासाठी असे निर्बंध आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायालयाने उपस्थित केलेला हा प्रश्न मोठ्या कायदेशीर बदलाचे संकेत मानला जात आहे. 'स्पर्श करण्याचा अधिकार' हा मूलभूत अधिकाराचा भाग मानला, तर देशातील अनेक मंदिरांमधील व्हीआयपी दर्शन आणि केवळ पुजाऱ्यांपुरता मर्यादित असलेला प्रवेश यांवर गंडांतर येऊ शकते.

# हिमालयीन प्रदेशात वाढत्या कचऱ्याचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : हिमालयीन प्रदेशात झपाट्याने वाढत असलेल्या कचऱ्याच्या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली असून, यावर तातडीने संरचित आणि शाश्वत व्यवस्थापन आराखडा राबवण्याची गरज असल्याचे एका श्वेतपत्रिकेत अधोरेखित करण्यात आले आहे. पर्यटनवाढ, शहरीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे निर्माण होणारा कचरा हा या संवेदनशील पर्यावरणासाठी मोठा धोका ठरत आहे.

अहवालानुसार, हिमालयीन राज्यांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असल्याने प्लास्टिक, अन्नकचरा आणि इतर घनकचऱ्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मात्र, त्या तुलनेत कचरा व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम नसल्याने अनेक ठिकाणी कचरा थेट दऱ्या, नद्या आणि जंगलांमध्ये टाकला जात आहे. यामुळे जलस्रोत दूषित होण्यासोबतच जैवविविधतेलाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः दुर्गम आणि डोंगराळ भागांमध्ये कचरा संकलन, वर्गीकरण आणि प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. अनेक गावांमध्ये कचरा जाळण्याची पद्धत अवलंबली जात असून, त्यामुळे वायुप्रदूषण वाढत आहे. तसेच, प्लास्टिक कचऱ्यामुळे मातीची गुणवत्ता खालावत असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हिमालयीन परिसंस्था आधीच असुरक्षित बनली आहे. त्यात कचरा समस्येची भर पडल्याने नैसर्गिक संतुलन बिघडण्याचा धोका अधिक वाढला आहे. हिमनद्या, नद्या आणि वनसंपदेवर याचा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे.

## विमान विलंबावरून ममतांचा भाजपवर आरोप

# निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी भारतीय जनता पक्षावर गंभीर आरोप करत, विमानतळावर "सोयीनुसार" अधिकारी तैनात करून त्यांच्या प्रचार दौऱ्यात अडथळे निर्माण केल्याचा दावा केला. त्यांच्या विमानाला सुमारे ३० मिनिटे धावपट्टीवर थांबवून ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

याआधी हेमंत सोरेन यांच्या हेलिकॉप्टरसोबतही अशाच प्रकारची घटना घडल्याचा उल्लेख करत, प्रशासनाकडून राजकीय सभांना परवानगी देताना अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. "सभेसाठी परवानगी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. मुद्दाम कार्यक्रम उशिरा करण्याचा प्रयत्न झाला," असे त्या म्हणाल्या. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुखांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांविरोधात खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याचा कट रचला जात असल्याचा आरोपही केला. अधिकाऱ्यांनी निःपक्षपातीपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

खरदाहा येथील सभेत बोलताना त्यांनी पक्षाचे उमेदवार देवदीप पुरोहित यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. तसेच इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) वापरात अनियमितता होण्याची शक्यता व्यक्त करत मतदारांनी मतदान व मतमोजणीदरम्यान सतर्क राहावे, असे सांगितले. केंद्र सरकारवर टीका करताना त्यांनी निवडणुकांदरम्यान सशस्त्र दलांच्या तैनातीवरही प्रश्न उपस्थित केला. "चिलखती वाहने आणली जात आहेत. बंगालचे लोक दहशतवादी आहेत का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत त्यांनी रोजगार आणि आर्थिक आश्वासनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "२४ कोटी नोकऱ्या आणि १५ लाख रुपयांचे आश्वासन कुठे गेले?" असा सवाल त्यांनी केला.

महिला आरक्षण विधेयकाच्या अंमलबजावणीला विलंब होत असल्याची टीका करत त्यांनी मतदारसंघ पुनर्रचनेवरूनही केंद्रावर आरोप केले. भाजपवर धार्मिक व सांस्कृतिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, "सत्तेत आल्यास एनआरसी लागू करण्याचा प्रयत्न होईल," असे त्या म्हणाल्या. पश्चिम बंगालमध्ये २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार असून, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. राज्यात विधानसभेच्या २९४ जागा असून बहुमतासाठी १४८ जागांची गरज आहे. २०२१ च्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने ४८.५ टक्के मतांसह २१३ जागा जिंकत सत्ता राखली होती, तर भाजप ७७ जागांसह प्रमुख विरोधी पक्ष ठरला होता.

# अमेरिका-इराण संघर्षात पाकची आर्थिक कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद** : पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानसमोर गंभीर आर्थिक आव्हाने उभी ठाकली असून, इराणशी संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी शांततापूर्ण तोडगा काढण्याची भूमिका स्वीकारणे त्यांच्यासाठी अत्यावश्यक बनले आहे. आर्थिक अडचणींनी ग्रासलेल्या पाकिस्तानला सध्या युद्धजन्य परिस्थिती परवडणारी नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था आधीच कर्जबाजारीपण, परकीय चलन साठ्याची कमतरता आणि महागाईच्या वाढत्या दबावाखाली आहे. अशा स्थितीत इराणसोबत तणाव वाढल्यास त्याचे थेट परिणाम देशाच्या आर्थिक स्थैर्यावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः ऊर्जा पुरवठा, सीमाव्यापार आणि प्रादेशिक गुंतवणुकीवर याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

इराण-पाकिस्तान सीमेवरील सुरक्षाविषयक प्रश्न, दहशतवादी हालचाली आणि सीमावाद यामुळे अधूनमधून तणाव निर्माण होत असतो. मात्र, सध्याच्या परिस्थितीत दोन्ही देशांसाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच एकमेव व्यवहार्य मार्ग असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर जागतिक वित्तीय संस्थांकडून मदतीची गरज आहे. अशा वेळी प्रादेशिक अस्थिरता निर्माण झाल्यास परकीय गुंतवणूक आणखी कमी होऊ शकते. परिणामी, आधीच दबावाखाली असलेल्या अर्थव्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडू शकतो.

तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानने इराणसोबत संबंध सुधारण्यावर भर देत, व्यापार आणि ऊर्जा सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. यामुळे आर्थिक पुनरुज्जीवनाला काही प्रमाणात चालना मिळू शकते.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय स्तरावरही दोन्ही देशांनी संयम राखावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पाकिस्तानची भूमिका महत्त्वाची मानली जात असून, कोणत्याही प्रकारचा संघर्ष टाळणे हेच त्यांच्या दीर्घकालीन हिताचे ठरणार आहे. आर्थिक अडचणींनी गुदमरलेल्या पाकिस्तानसमोर इराणबाबत आक्रमक धोरण स्वीकारण्याचा पर्याय जवळपास नाही.

## अमली पदार्थ तस्करांची मालमत्ता जप्त

**जम्मू** : अमली पदार्थांविरोधात तीव्र कारवाईचा भाग म्हणून, जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी मंगळवारी बारामुल्ला आणि अनंतनाग जिल्ह्यांतील दोन कथित अमली पदार्थ तस्करांची ५५ लाखांहूनही अधिक किमतीची मालमत्ता जप्त केली आहे, अशी माहिती संबंधितांनी दिली. बारामुल्ला येथील एका तस्कराची ४५ लाख रुपयांची स्थावर मालमत्ता जप्त केली, तर उधमपूर जिल्ह्यातील अनंतनाग येथील एकाची १० लाख रुपयांची जंगम मालमत्ताही जप्त केली.

## अखिलेश यादव यांचा पलटवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याला ठाम शब्दांत प्रत्युत्तर देत "आम्हाला अशा मित्रांची गरज नाही," असे स्पष्ट केले. लोकसभेत मोदींनी "अखिलेशजी माझे मित्र आहेत, ते कधीकधी मदत करतात," असे विधान केल्यानंतर उत्तर प्रदेशच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे.

मंगळवारी लखनौ येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अखिलेश यादव यांनी या विधानाचा समाचार घेतला. "हा महत्त्वाचा मुद्दा आहे, मात्र सभागृहात आमचा माइक बंद होता. आम्ही त्याच वेळी सांगितले असते की, आम्हाला अशा मित्रांची आवश्यकता नाही," असे त्यांनी नमूद केले. तसेच, "मी नेमकी कोणती मदत केली, हे पंतप्रधानांनीच स्पष्ट करावे. माझ्या माहितीनुसार असे काहीही घडलेले नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेने सतर्क राहण्याचे आवाहन करत, पराभवाच्या भीतीने भाजप टोकाची पावले उचलू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची पदयात्रा ही विरोधी पक्षात बसल्यानंतर कसे आंदोलन करायचे याचा सराव आहे. सत्तेत असतानाच विरोधी पक्षाची भूमिका करण्याचा हा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले. लोकसभेत नामंजूर झालेल्या संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयकाच्या संदर्भात अखिलेश यादव यांनी हा निकाल "ऐतिहासिक लोकशाही विजय" असल्याचे म्हटले.

## पहलगाम हल्ल्याची वर्षपूर्ती

# जखमा अजूनही ताज्याच; पीडित कुटुंबीयांची वेदना व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याला वर्ष पूर्ण होत असताना, पीडितांच्या कुटुंबीयांच्या जखमा आजही भरून न आलेल्या असल्याचे चित्र समोर आले आहे. या हल्ल्यात पाकिस्तान-समर्थित दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांची हत्या केली होती. वर्ष उलटून गेले तरी त्या घटनेच्या आठवणी आणि वेदना अजूनही ताज्याच असल्याचे कुटुंबीयांनी व्यक्त केले.



दिवंगत कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी संगीता गणबोटे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "पहलगाममधील हल्ला अत्यंत भीषण होता. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी तो विसरू शकणार नाही. पतीच्या निधनानंतर आयुष्य पूर्णतः बदलून गेले आहे." त्यांनी दहशतवाद्यांना थेट संदेश देताना स्पष्ट केले की, "जर तुमचा संघर्ष सरकारशी असेल, तर सामान्य नागरिकांना लक्ष्य करणे योग्य नाही. निरपराध लोकांना मारून काहीही साध्य होत नाही." तसेच, भविष्यात अशा घटनांना सामोरे जाण्यासाठी शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या प्रशांत सत्पथी यांच्या पत्नी प्रियदर्शनी आचार्य यांनीही आपल्या आयुष्यात झालेल्या मोठ्या बदलांची वेदनादायी कहाणी मांडली. "एक वर्ष झाले, पण एकही दिवस असा गेला नाही की त्यांच्या आठवणी येत नाहीत. ते असताना आयुष्य वेगळे होते. आता जगण्यासाठी नोकरी ही गरज बनली आहे," असे त्या म्हणाल्या. त्यांनी सरकारकडे केलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची मागणी करत सांगितले की, "आर्थिक मदत मिळाली असली तरी सरकारी नोकरीचे आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. मुलाच्या शिक्षणाची जबाबदारीही मोठी आहे. सरकारने दिलेली आश्वासने लवकर पूर्ण करावीत."

या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात तीव्र संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर अचूक कारवाई केली. ७ मे २०२५ रोजी सुरू झालेल्या या कारवाईत लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन या संघटनांच्या नऊ प्रमुख तळांचा नाश करण्यात आला. या मोहिमेत १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. या कारवाईनंतर पाकिस्तानकडून ड्रोन हल्ले आणि तोफगोळ्यांचा मारा करण्यात आला. मात्र परिस्थिती चिघळत गेल्यानंतर १० मे रोजी दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधीवर सहमती झाली.

या भीषण घटनेनंतरही काश्मीरमध्ये पर्यटन हळूहळू पुन्हा वाढताना दिसत आहे. अनेक पर्यटकांनी काश्मीर सुरक्षित असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. पहलगाम हल्ल्याला वर्ष पूर्ण झाले असले तरी पीडित कुटुंबीयांसाठी ही जखम अजूनही भरून न आलेली आहे. न्याय, सुरक्षितता आणि दिलेल्या आश्वासनांची पूर्तता या तीनच अपेक्षा आजही या कुटुंबीयांच्या मनात ठामपणे आहेत.